# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

### अपील क्रमांक : ८०८/२०२२

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. एस. आर. शाह, आजाद नगर, टेका, नई बस्ती, मुशाहिद मोबाईल शॉपीच्या समोर, नागपूर-४४००१७ | शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर | शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर |

### सुनावणी दिनांक :- ११/११/२०२४

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १७.०३.२०२२

(२) द्वितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७.०३.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती न मिळाल्यामुळे

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कारवाई करण्याचे आदेश निर्गमित करावे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २८.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन-२०२० ते पुढे

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : १) (१) क्र.जिपना/शि.अ./माध्य./संकीर्ण/९७/२०२१ कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. परिषद, नागपूर दिनांक २५.०६.२०२१ व (२) क्र. जिपना/शि.अ./माध्य./संकीर्ण/६१५१/२०२१ कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर दिनांक ०२.०८.२०२१ ला या कार्यालयाद्वारे प्रस्तावित चौकशी समितीला संबंधीत शाळांची छायाचित्रीकरणासह तपासणी करुन त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास व मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना सादर करावा असे आदेश निर्गमित केले असता, तदनंदर त्या प्रस्तावित चौकशी समितीने संबंधीत शाळांची या कार्यालयात सादर केलेले छायाचित्रीकरणासह तपासणी अहवालाची साक्षांकित प्रत देण्यात यावी.

जन प्रस्तावित चौकशी समितीने आजपर्यंत संबंधित शाळांची छायाचित्रीकरणासह तपासणी अहवाल सादर केले नसल्यास त्यांचे कारणासह खुलासा ची साक्षांकित प्रत व त्यांच्यावर या विभागातर्फे केलेले कारवाईच्या अहवालाची साक्षांकित प्रत देण्यात यावी. २) या प्रकरणावर शासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रस्तावित चौकशी समितीवर स्थगिती देण्याबाबतचे आदेशाचे साक्षांकित प्रत देण्यात यावी.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्जाबाबत उत्तर देण्याची कार्यवाही केलेली आहे.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ११.०२.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नसल्यामुळे.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणताही कार्यवाही केलेली नाही.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

सदर प्रकरणी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी आज सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपस्थित आहेत.

१) जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दिनांक १२.०२.२०२२ चे पत्र क्रं. जिपना/शिअ/माध्य/मा.अ.अ-२००५/१३९८/२०२१ चे सादर केलेला असुन, तो खालीलप्रमाणे आहे.

"फिरोज विद्या समिती मिलींदनगर नागपूर या संस्थेद्वारे संचालीत फिरोज विद्यालय धम्मदिपनगर, नागपूर व फिरोज गांधी विद्यालय, पवननगर, नागपूर या शाळांची आर.टी.ई. नुसार छायाचित्रीकरणाद्वारे सखोल तपासणी करण्या संदर्भात मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने, चौकशी केली असल्यास तपासणी अहवालाची प्रत उपलब्ध करून देण्याबाबत तसेच तपाणी झाली नसल्यास करणासह खुलासा तसेच प्रस्तावित चौकशीत वरिष्ठ अधिकाऱ्याकडून स्थगीती देण्याबाबतच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत या कार्यालयास विनंती केली आहे.

सबब सदर माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने, आपणास कळविण्यात येत की, आर.टी.ई. च्या अनुषंगाने, तपासणी करण्याची बाब किंवा आर.टी.ई. हा विषयी (प्राथ) या कार्यालयांशी संबंधीत आहे.

तथापी प्रस्तुत प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्य/प्राथमिक) दोन्ही कार्यालयानांना प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापी, चौकशीची कार्यवाही होण्यापुर्वीच मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांनी सदर चौकशीची कार्यवाही थांबविण्याबाबत मा. शिक्षणाधिकारी (प्राथ) यांना निर्देश दिले असल्याने ती बाब या ठिकाणी गृहीत धरून कार्यालय प्रमुखांच्या तोंडी आदेशामूळे प्रस्तुत प्रकरणी चौकशीची

कार्यवाही थांबविण्यात आली होती. ही बाब आपणांस पुर्णत: माहिती आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ३ ची प्रत या पुर्वीच आपणांस उपलब्ध करुन देण्यात आली होती.
तसेच सद्यस्थितीत शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी पुनश्च: चौकशीची कार्यवाही करण्या संदर्भात मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांना मार्गदर्शन मागीतले असता, मा. मंत्री महोदय, यांचे संदर्भिय पत्र दिनांक ०५.१०.२०२१ च्या अधिन राहून प्रस्तुत चौकशीत पुढील आदेशापर्यंत स्थगीत देण्यात आली असल्याचे कळविले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी चौकशीची कार्यवाही करता आली नाही."

**६. निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त दिनांक १२.०२.२०२२ च्या पत्राद्वारे वस्तुस्थिती कळविली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य आहे.

२) प्रथम अपिल अधिकारी यांनी प्रथम अपीलाबाबत कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेवून आदेश पारीत केले नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६(मा.अ.) दि. १२.१२.२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि. ३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये? याचा लेखी खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास सादर करावा.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.११.२०२४**

जावक क्रमांक 241 दिनांक 13 JAN 2025